

# महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड ३, अंक २ — एप्रिल २०२२ (क्र.९)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३

तंत्रज्ञान आणि संवर्धन

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

टिपेश्वर अभयारण्य ४

शिकारीसाठी लावलेल्या जाळीमुळे मार्च महिन्यात जखमी वाघाचा टिपेश्वरात संचार

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ४

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वापरासाठी विशेष सुरक्षारक्षक वाहन

अंधारी अभयारण्याच्या क्षेत्र विस्ताराला राज्य वन्यजीव मंडळाची मंजुरी

ताडोबा अंधारीतील रेडिओ कॉलर लावलेल्या वाघाचा मृत्यू

ताडोबा अंधारी लगत फेब्रुवारी महिन्यात माणूस-वाघ संघर्ष तीव्र, वीज केंद्रात एक वाघ जेरबंद

ताडोबा अंधारी नजीक जमावामुळे बिथरलेल्या वाघाच्या पळून जाण्याच्या प्रयत्नात दोघे जखमी

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ८

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वीजेच्या धक्क्याने वाघाचा मृत्यू

ब्रह्मपुरीतील चार वाघिणींना नवेगाव नागझिऱ्यात सोडण्याची योजना

पेंच व्याघ्र प्रकल्प १०

पेंच व्याघ्र प्रकल्पात कोलितमारा इथे वन्यजीव सफारीसह कृषी पर्यटन

मेळघाट व्याघ्र प्रकल्प १०

मेळघाटात एप्रिल महिन्यात ५०० हेक्टर जंगलात वणवा

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ११

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात दोन महिन्यांत आठ शिकाऱ्यांना अटक

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील शालेय विद्यार्थ्यांच्या समस्येची उच्च न्यायालयाकडून गंभीर दखल

**राज्यस्तरीय बातम्या** १२

वीजेच्या धक्क्यामुळे होणाऱ्या वन्य प्राण्यांच्या मृत्युंची गंभीर दखल

क्षेत्रीय वनाधिकाऱ्यांसाठी कायदेविषयक कार्यशाळा

पश्चिम महाराष्ट्र १४

सातारा जिल्ह्यात वन विभागाने दोन वर्षांत ८० शिकारी पकडले

विदर्भ १४

नागपूर-काटोल मार्गाच्या चौपदरीकरणाला वन विभागाचा आक्षेप

कमलापूर छावणीतील हत्तींच्या स्थानांतरणाबाबत पुनर्विचाराची स्थानिकांची मागणी

माणसर-खांडवा रस्ता रुंदीकरणासाठी २०,५०० झाडांचा बळी; भरपाईदाखल लावलेली लाखभर रोपे मृत

गडचिरोली जिल्ह्यात फेब्रुवारी, मार्चमध्ये २० चौ. किमी जंगलाला वणवा

आफ्रिकी सफारीसह नवे वन्यजीव प्रकल्प उभारण्याबाबत राज्य सरकारची घोषणा

कोकण १७

महाराष्ट्रात ग्रीन सी टर्टल ह्या प्रजातीच्या समुद्री कासवाच्या घरट्याची पहिली नोंद

रत्नागिरी जिल्ह्यात अंकन केलेल्या समुद्री कासवांच्या निरीक्षणातून नवी माहिती

माणूस-बिबट्या संघर्ष संक्षिप्त वृत्त १९

**आंतरराज्यीय बातम्या** २०

कान्हा व्याघ्र प्रकल्प

कान्हा व्याघ्र प्रकल्पात नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया

सातपुडा व्याघ्र प्रकल्प/मेळघाट व्याघ्र प्रकल्प

सातपुडा व्याघ्र प्रकल्पातील वाघीण पोहोचली मेळघाट व्याघ्र प्रकल्पात


**राष्ट्रीय बातम्या** २१

भारतात ३१०० लांडगे; पहिलीच पद्धतशीर गणना

उपग्रहामार्फत मिळालेल्या माहितीनुसार भारताच्या ३३% किनाऱ्याची सातत्याने धूप

**थोडक्यात पण महत्त्वाचे...** २४

जैवविविधता आणि भाषिक विविधता यांच्यातील परस्परसंबंध



**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड ३, अंक २, एप्रिल २०२२ (क्र. ९)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

**संपादकीय पत्ता:**C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेल:**marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळ:**https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/

***

टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***

## संपादकीय

### तंत्रज्ञान आणि संवर्धन

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे निसर्गातील जैविक, अजैविक घटकांविषयीची प्रचंड माहिती माणसाला मिळवता येऊ लागली आहे. प्रस्तुत अंकात अशा किमान तीन घटनांविषयीचे वृत्तांकन आले आहे; उपग्रहामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे भारताच्या ३३.६% किनाऱ्याची सातत्याने धूप होत असल्याचे दिसून आले आहे; भारतातील 'इंडियन पेनिन्सुलर वुल्फ' अर्थात लांडग्यांची संख्या व लांडग्यांसाठी योग्य, उपलब्ध अधिवासाचा माव किती आहे हे शोधण्याकरता तंत्रज्ञानाचा उपयोग झाला आहे; आणि महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर वीणीसाठी येणाऱ्या समुद्री कासवांच्या स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठी उपग्रहाधारित तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. ह्या तिन्ही प्रकरणांमध्ये तंत्रज्ञानाची मदत घेतल्यामुळे एरवी मिळवता आली नसती अशी माहिती माणसाला मिळाली आहे.

तंत्रज्ञान हाताशी असल्याने आता वन्य प्राण्याची गणना करून त्याची जवळजवळ नेमकी संख्या निश्चित सांगता येणे शक्य झाले आहे. वाघ, सिंह, हत्ती, बिबटे, समुद्री कासवे अशा मोठ्या प्राण्यांसह इतर लहानसहान उभयचर, सरपटणारे प्राणी, स्थानिक व स्थलांतरीत पक्षी ह्यांचीही गणना करता येते. विविध गटातील प्राण्यांच्या हालचालींचा दीर्घकाळ आणि हजारो किलोमीटर अंतरापर्यंतसुद्धा मागोवा घेणे शक्य झाले आहे; उदा. ऑलिव रिडले कासवे किंवा अमूर फाल्कन नामक पक्ष्याच्या स्थलांतराच्या मार्गाचा अभ्यास. ठराविक प्रकारच्या अधिवासाची उपलब्धता, व्याप्तीचे क्षेत्र शोधून काढता येऊ लागले आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून एखादा प्राणी नेमका कुठून कुठे चालला आहे हे अचूक सांगता येते. एका संरक्षित क्षेत्रापासून दुसऱ्या संरक्षित क्षेत्रापर्यंत चालत जाणाऱ्या वाघांबाबत वृत्तांकन '*महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा*'त अधूनमधून येत असते.

तेव्हा, माणसाकडे वन्यजीवांविषयी भरपूर माहिती आहे. तरीदेखील, निसर्ग अभ्यासक, संशोधकांच्या मते आपल्याकडे असलेली माहिती – केवळ वाघाविषयीचीच नव्हे; तर एकूणच निसर्गाविषयीची – पुरेशी नाही. आणखी अभ्यास, संशोधनातून माहिती गोळा करणे गरजेचे आहे. हे खरेच. कारण, नैसर्गिक प्रक्रिया क्लिष्ट, गुंतागुंतीच्या असतात; एका ठिकाणी एखादी प्रजाती अशी वागली म्हणून ती दुसऱ्या ठिकाणी तशीच वागत असेल, असे खात्रीने सांगता येत नाही. वन्यजीव संवर्धनासाठी सर्वत्र सारख्याच उपाययोजना लागू होत नाहीत. त्यामुळे आणखी अभ्यास-संशोधनाची गरज आहे. पण त्याबरोबरच, प्रश्न असा आहे की हाती आलेल्या माहितीचा म्हणून संवर्धनासाठी आपण कसा उपयोग करून घेतो?

एकीकडे समुद्री कासवाच्या वीणीसाठी किनाऱ्यावर परतून येण्याच्या सवयीचा पुरावा मिळाला म्हणून आपण आनंदून जातो. मात्र, त्याचवेळी, भारतीय किनाऱ्याच्या होत असलेल्या क्षरणाचा समुद्री कासवांच्या सवयीवर प्रभाव पडणार आहे, हे आपण लक्षात घेतो का? लांडग्यांचीही गणना झाली ह्याविषयी समाधान वाटून घेताना ह्या प्राण्याच्या अस्तित्त्वाला असलेला धोकाही वाघाच्या अस्तित्त्वाला असलेल्या धोक्याइतकाच गंभीर आहे, हे आपण लक्षात घेतो का?

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, वन्य प्राण्यांबाबत निर्माण झालेल्या जवळपास प्रत्येक समस्येचे मूळ माणूसच – मग तो अभ्यासक, संशोधक, अधिकारी किंवा निव्वळ सामान्य माणूस असो – आहे, हे आपण लक्षात घेतले आहे का?

कुतूहलशमनासाठी विज्ञान-तंत्रज्ञानात प्रगती साधून प्रश्नांची उत्तरे मिळवणे हा मनुष्यस्वभाव आहे. मात्र, संवर्धनासाठी वापरले तरीही तंत्रज्ञानाची पर्यावरणीय किंमत मोजावी लागतेच. तेव्हा त्याआधारे माहिती मिळवताना, संवर्धन खरोखरीच होते आहे का हा प्रश्न आपण लक्षात घेतो का?

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

टिपेश्वर अभयारण्य

### शिकारीसाठी लावलेल्या जाळीमुळे मार्च महिन्यात जखमी वाघाचा टिपेश्वरात संचार

टिपेश्वर अभयारण्यात वन्य प्राण्यांची शिकार करण्याच्या हेतूने लावलेल्या तारांच्या जाळीत एक वाघ अडकला. त्या वाघाने जाळी तोडून स्वतःची सुटका करून घेतली, मात्र त्या प्रयत्नात गळ्यात जाळीची तार अडकल्यामुळे हा वाघ जखमी झाल्याचे वृत्त आहे.

अभयारण्यात जखमी अवस्थेत फिरत असलेल्या वाघाच्या गळ्यातील तार काढून त्याच्यावर उपचार करण्यासाठी अमरावती इथले बचाव पथक प्रयत्नशील होते, असे वृत्तात नमूद केले आहे. २५ मार्च पूर्वी आठ दिवस एका पर्यटकाने जखमी वाघाला पाहिले होते व टिपेश्वरच्या वनाधिकाऱ्यांना त्याबाबत माहिती दिली होती. अभयारण्यात लावलेल्या एका स्वयंचलित कॅमेऱ्यामध्येही हा वाघ दिसून आला. टिपेश्वरातील पाटणबोरी वनपरिक्षेत्रातील एदलापूर व पिलखान वनक्षेत्रांत ह्या वाघाचा वावर असल्याचे दिसून आले आहे. मात्र, प्रस्तुत अंक छापखान्यात जाईपर्यंत ह्याबाबतचे अधिक वृत्त हाती आले नाही.

ह्या पूर्वी टिपेश्वरमध्ये १७ मार्च २०१९ रोजी तार गळ्यात अडकलेल्या टी-४ ह्या जखमी वाघिणीला उपचारासाठी जेरबंद करण्याच्या प्रयत्नात तिचा मृत्यू झाला; मात्र राजकीय दबावामुळे ह्या घटनेची चौकशी थंडबस्त्यातच राहिल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

**सूत्र** – *'टिपेश्वर अभयारण्यातील वाघाच्या गळ्यात अडकला शिकारीचा फास', www.lokmat.com, २५.०३.२०२२.*

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वापरासाठी विशेष सुरक्षारक्षक वाहन

वाघ पकडण्यासाठीची प्रचलित पद्धत म्हणजे वाघाला विशिष्ट बाणाद्वारे (डार्ट) इंजेक्शन मारून बेशुद्ध करणे. मात्र वाघ आक्रमक झाला किंवा तो जर अडचणींच्या जागेवर असेल तर त्याला 'डार्ट' मारता येत नाही. ही अडचण लक्षात घेऊन तयार केलेले विशेष सुरक्षारक्षक वाहन मार्च महिन्याच्या सुरुवातीला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे हस्तांतरित करण्यात आले.

'इंडियन एक्सप्रेस' समूहाचे अध्यक्ष-संचालक विवेक गोएंका आणि झिटा गोएंका यांनी १५ लाख रुपये किमतीचे हे वाहन भेटप्रकल्पाला दिले असून नागपुरातील 'श्री ऑटो रिस्टोअरर'चे संचालक श्रीश देवधर यांनी हे वाहन तयार केले आहे. या वाहनात ३६०० सीसीचे म्हणजे अन्य सामान्य वाहनांपेक्षा जास्त क्षमतेचे इंजिन बसवण्यात आले असून वाहन उंचही आहे. त्यामुळे चिखल, पाणथळ जागा अशा अडचणीच्या मार्गातून हे वाहन सहज मार्ग काढू शकते. वाहनात फ्रीज असल्यामुळे इंजेक्शने, औषधे ठेवणे शक्य आहे. हे वाहन जंगलातील दुर्गम भागात, कुठल्याही ऋतूत काम करू शकेल.

**सूत्र** – *'ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात विशेष सुरक्षा रक्षक वाहन; वन्य प्राण्यांच्या बेशुद्धीची प्रक्रिया आता सुलभ', www.loksatta.com, ०५.०३.२०२२.*



## अंधारी अभयारण्याच्या क्षेत्र विस्ताराला राज्य वन्यजीव मंडळाची मंजुरी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील अंधारी अभयारण्याचा क्षेत्र विस्तार करण्यास व हे क्षेत्र गाभा क्षेत्रात समाविष्ट करण्यास राज्य वन्यजीव मंडळाने मान्यता दिली आहे. विस्तारीकरणाचा प्रस्ताव राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण - NTCAकडे सादर करण्यात येणार आहे. प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर कारवा गावाच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात येईल. पालकमंत्री विजय वडेट्टीवार यांनी ही माहिती दिली.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात व्याघ्र सफारी व वन्यजीव बचाव केंद्रे निर्माण करावी, व्याघ्र प्रकल्पातंर्गत येणाऱ्या वनविभागाच्या कार्यालयासाठी ताडोबा भवनाचे बांधकाम करावे, रानतळोधी, कोळसा व कारवा या गावांचे पुनर्वसन करावे, माणूस व वन्यजीव संघर्ष कमी करण्याकरता शेतकऱ्यांना सौर कुंपण मंजूर करावे, बफर क्षेत्रामध्ये उंचावरून जाणाऱ्या वाहिन्यांद्वारे वीजपुरवठा केला जावा, व्याघ्र प्रकल्पातील संवेदनशील पर्यावरण क्षेत्राचा विकास आराखडा मंजूर करावा, तसेच व्याघ्र प्रकल्प पर्यटन विकास आराखड्यास मान्यता प्राप्त असल्याने या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्या पालकमंत्र्यांनी बैठकीत केल्या.

त्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले की चंद्रपूर शहरालगत व्याघ्र सफारी आणि वन्यजीव बचाव केंद्र निमिर्तीच्या प्रस्तावित करण्यात आलेल्या प्रकल्पाचे परिपूर्ण नियोजन करावे. बचाव केंद्राला मंजुरी मिळालेली आहे; ह्याला जोडूनच व्याघ्र सफारी करण्याचेही प्रस्तावित आहे. ह्या दोन्ही प्रकल्पाचे परिपूर्ण नियोजन करण्यात येऊन अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करावा.

**सूत्र** – *'ताडोबा प्रकल्पाचा होणार कायापालट',*

*maharashtratimes.com, ०५.०२.२०२२.*

## ताडोबा अंधारीतील रेडिओ कॉलर लावलेल्या वाघाचा मृत्यू



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात रेडिओ कॉलर लावलेला सुमारे साडेचार वर्षे वयाचा टी १६१ नर वाघ कारवा रेंजच्या वनखंड क्रमांक २९० मधील आंबेउतारा नाल्यात मृतावस्थेत आढळून आला. ही घटना ३० मार्च रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. गळ्याभोवती झालेल्या जखमेमुळे वाघाचा मृत्यू झाल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

या वाघाच्या गळ्यातील रेडिओ कॉलर काढण्यासाठी वनविभागाकडून २०१९ पासून प्रयत्न सुरू होते. परंतु त्यात यश आले नाही. फेब्रुवारी २०२२ मध्ये मिळालेल्या छायाचित्रात वाघाच्या गळ्याभोवती जखम दिसून आली होती. तेव्हापासून त्याचा शोध सुरू होता. दरम्यान, शोध पथकाला त्याचा मृतदेह नाल्यात आढळला. गळ्याभोवतीच्या जखमेमुळेच त्याचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदनाच्या प्राथमिक निष्कर्षावरून सांगितले जात आहे. वाघाचे अंतर्गत अवयव पुढील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

**सूत्र** – *रवींद्र जुनारकर. 'ताडोबात टी १६१ वाघाचा मृत्यू',*

*www.loksatta.com, ३०.०३.२०२२.*



## ताडोबा अंधारी लगत फेब्रुवारी महिन्यात माणूस-वाघ संघर्ष तीव्र, वीज केंद्रात एक वाघ जेरबंद



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या अवतीभवती असलेल्या परिसरात फेब्रुवारी महिन्यात सलग माणूस-वन्य प्राणी संघर्षाच्या घटना घडल्या. कोसंबी इथे १८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी शेतात काम करत असताना एक महिला वाघाच्या हल्ल्यात ठार झाली. चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या परिसरातून १६ फेब्रुवारीला एका कामगाराला वाघाने उचलून नेले. त्यापाठोपाठ १७ फेब्रुवारीला केंद्रासमोर असलेल्या दुर्गापूर नेरी इथल्या आदिवासी आश्रम शाळेच्या परिसरातून अल्पवयीन मुलाला वन्य प्राण्याने उचलून नेले. मात्र, हा वन्य प्राणी वाघ होता की बिबट्या याची खातरजमा झालेली नाही.

वीज केंद्राच्या परिसरात व अवतीभवती तीनचार वाघ, काही बिबटे आणि अस्वलांचा वावर आहे. १५ फेब्रुवारी रोजी केंद्राजवळच काही लोकांना एक वाघ दिसला होता व त्यामुळे ह्या परिसरात घबराट पसरली होती.

महाऔष्णिक वीज केंद्राचे क्षेत्रफळ सुमारे ११२ चौ. किमी. असून गेल्या पाच-सहा वर्षांपासून इथे वाघाचे वास्तव्य आहे. त्याआधी या परिसरात मोठ्या संख्येने बिबटे होते. २६ ऑगस्ट २०२० ला केंद्रातील निवासी परिसरात आई आणि तिची पाच वर्षांची मुलगी फिरत असताना मुलीला बिबट्याने उचलून नेले. त्यानंतर दोन डिसेंबर २०२१ ला वाघाने एका व्यक्तीला जखमी केले.

वीज केंद्राच्या परिसरात ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या दुचाकीचा वाघ, बिबट्याने पाठलाग केल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा घटना टाळण्याकरता वन खात्याने उपाययोजना करण्याकरता दिलेल्या अनेक सूचनांची अजूनही अंमलबजावणी झालेली नाही. यात प्रामुख्याने कोयना गेट ते योग भवन चौक रस्त्याच्या दुतर्फा तसेच योग भवन चौक ते गॅस गोदाम परिसर-नवीन सीआयएसएफ वसाहत परिसरातपर्यंत एकूण अंदाजे ३५०० मीटरचे चेनलिंक कुंपण करण्यास सुचवण्यात आले होते. त्याकरता निधीची तरतूद होईपर्यंत सौर ऊर्जेचा वापर करून कुंपण उभारण्याचा पर्याय देण्यात आला होता. मात्र, ह्या सूचनेची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. परंतु, वन विभाग समितीने ठरवून दिल्यानुसार रस्ते तयार करण्यात आले असून केंद्र परिसरात १० वनमजूर तैनात केल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

राज्याचे ऊर्जा मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना वीज केंद्र, वन विभाग, पोलीस आणि शहर आयुक्तांची एकत्रित बैठक घेऊन ह्या प्रकरणी तोडगा काढण्याची सूचना केली होती. त्यानुसार १७ फेब्रुवारी रोजी मुख्य वन संरक्षकांच्या कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानंतर वीज केंद्रातील एका वाघाला वन विभागाने २१ फेब्रुवारी रोजी जेरबंद केले. रात्री ९.३० वाजताच्या सुमारास ऊर्जानगरातील न्यू एफ गाळा इथे चंद्रपूर वीज केंद्र विशेष पथक आणि वन विभागाची संयुक्त मोहीम सुरू असताना ह्या पथकांना वाघ दिसला. त्याला दुरून इंजेक्शन मारून बेशुद्ध करण्यात आले व मग पकडले. स्थानिक आणि राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून दबाव वाढल्याने वाघाला तडकाफडकी रातोरात जेरबंद करण्यात आले. मात्र, वन्य प्राण्याला रात्री जेरबंद केल्याबाबत वन्यजीवप्रेमींनी आक्षेप घेतला आहे.

संयुक्त मोहीम सुरू असतानाच आणखी एक वाघ संच क्रमांक ८ व ९ परिसरात दिसून आला. त्यामुळे वाघ व बिबट्याला जेरबंद करा, या मागणीसाठी दुर्गापूर, ऊर्जानगरवासीयांनी २२ तारखेला कडकडीत बंद पाळला आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला.

दुर्गापूर, नेरी व इतर परिसरातील बिबट्यांना पकडण्याकरता पिंजऱ्यांची संख्या वाढवून गस्त सुद्धा वाढविणार असल्याचे वन विभागाने स्पष्ट केले. ह्या दोन्ही क्षेत्रांत अधिकृत कमीत कमी दोन चौक्या देऊन त्यात २४ तास कर्मचारी ठेवण्याची मागणी वन विभागाने मंजूर केली.

वीज केंद्रातून जेरबंद करण्यात आलेल्या वाघाला नैसर्गिक अधिवास द्या, अशी मागणी राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे सदस्य बंडू धोतरे यांनी राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनील लिमये यांच्याकडे केली आहे. ज्या वाघांचा माणसाशी संबंधित घटनेत सहभाग नाही, अशा वाघांना नैसर्गिक अधिवासात सोडण्याचे नियोजन करावे, असे त्यांनी म्हटले आहे.



**सूत्र** – *'Maharashtra Thermal Power Station Worker Killed In Tiger Attack'*, *www.ndtv.com, १७.०२.२०२२.*
*'चंद्रपूर: वन्यप्राण्याने १६ वर्षीय मुलाला उचलून नेल्याने वन खात्यात खळबळ', www.loksatta.com, १८.०२.२०२२.*
*'चंद्रपूर वीज केंद्र परिसरातील वन्यप्राणी संचार धोकादायक वळणावर', www.loksatta.com, १८.०२.२०२२.*
*'वन्यजीवांच्या हल्ल्यांनी चंद्रपूरमध्ये दहशत', maharashtratimes.com, १९.०२.२०२२.*
*'आणखी तीन वाघांना पकडण्यासाठी पथक तैनात', www.loksatta.com, २३.०२.२०२२.*
*'चंद्रपूर महाऔष्णिक केंद्रात ४ वाघांची दहशत, कामगाराचा बळी घेणाऱ्या पट्टेदार नराला पकडण्यात वन विभागाला यश', www.loksatta.com, २१.०२.२०२२.*

## ताडोबा अंधारी नजीक जमावामुळे बिथरलेल्या वाघाच्या पळून जाण्याच्या प्रयत्नात दोघे जखमी

चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा अंधारी नजीक असलेल्या गोंडपिंपरी तालुक्यात शेतात आलेल्या वाघाला पाहायला आलेल्या जमावातील दोघे, वाघ पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना, त्याच्या हल्ल्यात जखमी झाले. १४ एप्रिल रोजी ही घटना घडली.

धाबा वनक्षेत्रातील वेजागाव आणि आर्वी गावांदरम्यान शेतात शिकार केलेल्या गुराचे मांस खाणाऱ्या वाघाला पाहण्यासाठी लोकांनी गर्दी केली व त्यातील काहींनी वाघावर दगडफेकही केली. त्यामुळे बावचळून पळ काढण्याच्या प्रयत्नात असलेल्या वाघाकडून जमावातील दोघे जखमी झाले. परिणामी ह्या वाघाला पकडण्यासाठी वन विभागावरील दबाव वाढला आहे. स्थानिक ग्रामस्थ व लोकप्रतिनिधींच्या दबावामुळे वाघाला बेशुद्ध करून जेरबंद करण्यासाठी वन विभागाने पथक नेमले आहे.

फॉरेस्ट डेवलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्राच्या जंगल क्षेत्रात वावरणारा हा वाघ घटनेपूर्वी १० दिवसांपासून शेतांमध्ये वावरताना दिसत होता. घटनास्थळाजवळ त्याने दोन म्हशींची शिकार केली होती व तिथल्या नाल्याजवळ उंच गवतात त्या ओढून नेल्या

होत्या. शिकार खाण्यासाठी वाघ १४ एप्रिलच्या सकाळी नाल्याजवळ परतला तेव्हा ग्रामस्थांनी त्याला पाहिले आणि वाघाभोवती जमाव गोळा झाला. उपस्थित वनाधिकाऱ्याने ग्रामस्थांना गर्दी करण्यापासून व दगडफेकीपासून परावृत्त करण्याचे प्रयत्न केले. तरीही, जमावाने ऐकले नाही व परिणामी बिथरलेल्या वाघाने पळ काढण्याच्या प्रयत्नात दोघांना जखमी केले. जखमींना वनाधिकाऱ्यांनी चंद्रपुरातील शासकीय रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले.

चंद्रपूरचे मुख्य वन संरक्षक प्रकाश लोणकर यांनी घटनेची गंभीर दखल घेऊन वाघाला बेशुद्ध करून पकडण्यासाठी वरिष्ठांची परवानगी मागितल्याचे सांगितले. वाघ गावांमध्ये शिरू नये ह्या दृष्टीने वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वन विभागाने आठ स्वयंचलित कॅमेरे लावले आहेत. तसेच, एका पथकाची नेमणूक केली आहे. वाघ जेरबंद करून जंगलात रवाना होईपर्यंत हे पथक सध्या वाघाचा वावर असलेल्या परिसरातच मुक्काम करणार आहे.

**सूत्र** – *मजहर अली. 'Tiger charges at Chanda mob, injures two; capturing order issued', timesofindia.indiatimes.com, १५.०४.२०२२.*

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वीजेच्या धक्क्याने वाघाचा मृत्यू



पूर्ण वाढ झालेल्या बी-२ किंवा रुद्र नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाघाचा मृतदेह पलाडी-माथाडी रस्त्यावर जानेवारी महिन्याअखेरीस आढळला. नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या कोका वन्यजीव अभयारण्यापासून हे ठिकाण पाच किमी अंतरावर आहे. वाघाचा मृत्यू वीजेचा धक्का लागून झाल्याचा प्राथमिक अंदाज पशुरोगतज्ञ डॉ. गुणवंत भडके यांनी व्यक्त केला आहे.

मृत वाघाच्या शरीरावर जळल्याच्या दोन खुणा – एक खांद्याजवळ आणि दुसरी डाव्या पायावर – दिसत होत्या. तसेच, घटनास्थळी ११ किलोवोल्ट क्षमतेची वीजवाहक तार दिसून आली, ह्या बाबी लक्षात घेता वाघाला वीजेचा धक्का लागला असावा, असे डॉ. भडके यांनी सांगितले. भंडाऱ्याच्या उप वन संरक्षकांनी सांगितले की घटनास्थळापासून पाच किमी त्रिज्येच्या परिसरात जंगल नाही, सगळी शेतजमीन आहे. पिकांचे रानडुकरांकडून होणारे नुकसान टाळण्याकरता त्यांना ठार करण्यासाठी वीजवाहक तार लावली असावी.

ह्यापूर्वी तीन जानेवारी रोजी चंद्रपुरातील भद्रावती वन परिक्षेत्रात एका वाघिणीला वीजेचा धक्का देऊन ठार करण्यात आले. गडचिरोली जिल्ह्यातील पोरला वन परिक्षेत्रात ५ जानेवारी रोजी एका नर वाघाचा मृत्यू झाला; हद्द राखण्यासाठी झालेल्या झुंजीत हा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे; तर १३ जानेवारी रोजी नवेगाव राष्ट्रीय उद्यानाबाहेर अर्जुनी मोरगाव इथे एका नर वाघाची शिकार झाल्याचा अंदाज आहे. ह्या वाघाच्या मृतदेहाचे काही अवयव गायब होते. २७ जानेवारी रोजी राष्ट्रीय महामार्ग-७ वर पवनीजवळ वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या नर वाघावर गोरेवाडा बचाव केंद्रात उपचार सुरू असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

दरम्यान, शेती असलेले भाग वाघांच्या वावरायोग्य असल्याचे बी २च्या घटनेमुळे दिसून आले आहे. तेव्हा, अशा संवेदनशील भागांची नोंद संचारमार्ग व्यवस्थापनाच्या आराखड्यात करून ह्या भागांना अधिक

संरक्षण द्यावे, असे भंडारा जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षकांनी सुचवले आहे. हे घटनास्थळ राष्ट्रीय महामार्ग-६ पासून जेमतेम एक किमी अंतरावर असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे. ह्या घटनेत वीजवाहक तार वाघाच्या शरीराच्या संपर्कात आल्यानंतरही वीजप्रवाह खंडित झाला नाही, ह्यावरून ही जिवंत तार खासगी मीटरशी जोडल्याचे स्पष्ट होते, असेही ते म्हणाले.

**सूत्र** – *विजय पिंजरकर. 'Now, tiger electrocuted in Bhandara, 4th death in state', www.timesofindia.indiatimes.com, २९.०१.२०२२.*

### ब्रह्मपुरीतील चार वाघिणींना नवेगाव नागझिऱ्यात सोडण्याची योजना

ब्रम्हपुरी वनपरिक्षेत्रातील वाघांचे नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात स्थानांतरण करण्याची वन विभागाची योजना आहे.

ब्रम्हपुरी वन विभागात नव्या आकडेवारीनुसार ५७ वाघ आहेत; त्यातील २२ बछडे आहेत. तसेच विभागात सुमारे १०० बिबटे आहेत. सिंदेवाही, दक्षिण ब्रम्हपुरी, उत्तर ब्रम्हपुरी व तळोधी वनपरिक्षेत्रांतर्गत वाघांच्या हालचाली दिसून आल्या आहेत. इथल्या माणूस-वन्यजीव संघर्षावर नियंत्रण आणण्यासाठी चार वाघिणींना नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात सोडण्याची राज्याच्या वन विभागातील वन्यजीव भागाने ठरवले आहे.

दीड ते दोन वर्षांच्या ह्या चारही वाघिणी एकाच मादीच्या बछड्या आहेत. त्यांना नागझिरा इथे आधी देखरेखीखाली बंदिस्त भागात ठेवून मग मोकळे सोडण्याची योजना असल्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांनी सांगितले.

गेले सहा महिने वन विभाग ह्या वाघिणींवर लक्ष ठेवून आहे, तसेच, त्यांना नागझिऱ्यात सोडल्यानंतर त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याकरता त्यांना रेडिओ कॉलर लावण्यात येणार आहे. वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया –WII चे संशोधक बिलाल हबीब यांच्या मदतीने ह्या योजनेची अंमलबजावणी केली जाणार आहे. वन विभागातील कर्मचाऱ्यांना योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीकरता सक्षम करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जात आहे.

वर्ष २०२१ मध्ये माणूस-वन्यजीव संघर्षात राज्यात ८४ जण ठार झाले. पैकी ४४ मृत्यू चंद्रपूर जिल्ह्यात व १६ गडचिरोली जिल्ह्यातील घटनांमध्ये झाले. चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या वाघ-माणूस संघर्षावर नियंत्रण मिळवण्याकरता तिथल्या वाघांना इतरत्र हलवण्याचा वन विभागाचा बेत आहे. नवेगाव नागझिऱ्यात वाघांचे लिंग गुणोत्तर असंतुलीत आहे, मादी वाघ तिथे सोडल्याने भविष्यात ते संतुलन राखण्यास मदत होईल, म्हणून ब्रह्मपुरीतील चार वाघिणींना तिथे सोडले जाणार आहे.

मात्र, नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात काम केलेले वन्यजीव तज्ञ आणि माजी वनाधिकारी ह्यांनी ह्या संदर्भात सावधगिरीची भूमिका मांडली आहे. तीन वर्षांपूर्वी ह्या व्याघ्र प्रकल्पात वाघांचे लिंग गुणोत्तर ३:५ (मादीःनर) असे होते. माद्यांची संख्या नरांपेक्षा कमी होती, त्यामुळे तेव्हा वाघिणी सोडण्याचा निर्णय योग्य ठरला असता. मात्र आता हेच लिंग गुणोत्तर बदलून ५:३ म्हणजे माद्यांची संख्या नरांपेक्षा जास्त असे झाले आहे आणि सर्व वाघिणींना बछडे आहेत. त्यामुळे आता आणखी वाघिणींची भर घालणे कितपत योग्य ठरेल, असा प्रश्न तज्ञांनी उपस्थित केला आहे.

नवेगाव राष्ट्रीय उद्यानात टी-११ नामक वाघिणीने गेल्या सहा वर्षांत तीन वेळा पिल्लांना जन्म दिला. पहिल्या खेपेस दोन नर व दुसऱ्या खेपेस तीन मादी आणि आता तिसऱ्या खेपेस तीन बछडे तिने जन्माला घातले आहेत. पहिल्या खेपेस जन्मलेला एक नर आता उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात स्थिरावला आहे. तो वगळता इतर मोठे झालेले नर व मादी वाघ नवेगाव नागझिऱ्याच्या गाभा व बफर क्षेत्रात स्थिरावले आहेत. ह्या व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात जवळपास १५० गावे

आहेत. त्यामुळे प्रकल्पात वाघांची संख्या आणखी वाढल्यास इथेही माणूस-वाघ संघर्षाचे प्रसंग उद्भवतील, अशी शक्यता जाणकारांनी व्यक्त केली आहे.

**सूत्र** – *विजय पिंजरकर. ‘4 tigresses to be released in Nagzira by April-end’, timesofindia.indiatimes.com, २५.०३.२०२२.*
*पंकज मोहरीर. ‘ब्रह्मपुरीतील वाघोबा नवेगाव नागझिऱ्यात हलवणार’, maharashtratimes.com, २६.०३.२०२२.*

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### पेंच व्याघ्र प्रकल्पात कोलितमारा इथे वन्यजीव सफारीसह कृषी पर्यटन

पेंच व्याघ्र प्रकल्पात कोलितमारा इथे वन्यजीव सफारीसह कृषी पर्यटन असा प्रयोग प्रथमच केला जात आहे.

प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील नागलवाडी वनपरिक्षेत्रात पेंच नदीच्या पश्चिमेकडच्या काठावर कोलितमारा गाव वसलेले आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या सात प्रवेशद्वारांपैकी एक कोलितमारा इथे असून वन विभागाने जुने विश्रामगृह ह्या ठिकाणी आहे. स्थानिक महिला बचत गट, पर्यावरणीय विकास समिती (ईडीसी) व शेतकऱ्यांशी सामंजस्य करार करून प्रकल्प प्रशासन सफारीसह कृषी पर्यटनाचा उपक्रम राबवणार आहे.

शेतकरी पर्यटकांना कृषी पर्यटन घडवतील, महिला पर्यटकांसाठी आहाराची व्यवस्था करतील आणि व्याघ्र प्रकल्प प्रशासन सफारीचे आयोजन करतील. सहा व्यक्तींसाठी रु. २००० मध्ये बैलगाडीतून फेरफटका, म्हशीवरून सवारी आणि शेतीशी संबंधित कामांची माहिती व त्यात सहभाग असे कृषी पर्यटनाचे रूप असेल. निवास व आहाराचे शुल्क वेगळे आकारले जाईल. त्याबरोबरच पर्यटकांना त्यांच्या निवासकाळात विटी-दांडू, गोट्या, लगोरी असे पारंपरिक खेळ खेळण्याच्या व स्थानिक आदिवासी संस्कृतीची ओळख करून घेण्याच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जातील. रात्री शेतात मचाणावर मुक्काम व आकाश निरीक्षणाची संधीही असेल. पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालकांनी ही माहिती दिली.

पेंचच्या पूर्वेकडच्या सिल्लारी प्रवेशद्वारावर पर्यटकांची गर्दी होते. त्या तुलनेत कोलितमारा प्रवेशद्वार दुर्लक्षित आहे. प्रकल्प प्रशासनाच्या नव्या उपक्रमाने कोलितमाराकडे पर्यटक आकर्षित होतील आणि स्थानिकांना – सुमारे ५० जणांना तरी - वर्षभर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी प्रकल्पाधिकाऱ्यांची अपेक्षा आहे.

**सूत्र** – *विजय पिंजरकर. ‘Safari, agro-ecotourism to go together in Kolitmara’, timesofindia.indiatimes.com, २५.०३.२०२२.*

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### मेळघाटात एप्रिल महिन्यात ५०० हेक्टर जंगलात वणवा



मेळघाटातील घटांग, गावीलगड, रायपूर व जामली खोंगडा वनपरिक्षेत्रांत एप्रिल महिन्यात लागलेल्या वणव्यात जवळपास ५०० हेक्टरवरील जंगल जळून गेले आहे.

वणवे लागू अथवा लावले जाऊ नयेत ह्यासाठी वन विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जनजागृती व


उपाययोजना केल्या जात आहेत, व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन केले जात आहे; तरीदेखील जंगलात आगी लागण्याचे प्रमाण कमी झालेले दिसत नाही.

संयुक्त वन व्यवस्थापन आणि श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजना ह्या अंतर्गत दोन वेगवेगळ्या समित्या प्रत्येक आदिवासी गावात चराईबंदी, कुऱ्हाडबंदी व आगीपासून जंगल वाचवण्यासाठी कार्यरत आहेत. ह्या समित्यांचे विविध उपक्रम, त्याकरता साहित्यासाठी वन विभाग व व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. परंतु, आग विझवण्यासाठी स्थानिक लोक पुढे येत नसल्यामुळे आपण हतबल असल्याचे वनाधिकारी, कर्मचारी व व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने म्हटले आहे.

**सूत्र** – *नरेंद्र जावरे. 'मेळघाटात उसळला आगडोंब; कोट्यवधींचा खर्च कागदावर', www.lokmat.com, ०६.०४.२०२२.*

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात दोन महिन्यांत आठ शिकाऱ्यांना अटक



मार्च-एप्रिल महिन्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये आठ जणांना सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात शिरल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली. ह्या आठ जणांचा शिकारीचा हेतू असल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात शिकारीसाठी वापरली जाणारी हत्यारे घेऊन शिरलेल्या तिघांना वन विभागाने अटक केली. प्रकल्पात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात ३१ मार्च रोजी गाभा क्षेत्रात शिरताना हे तिघे दिसून आले. वनरक्षकांनी त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून ही बाब वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर वन विभागाने पथक नेमून तपासाला सुरुवात केली. ह्या पथकाला संगमेश्वर तालुक्यातील हातीव गावात संशयास्पद हालचाली दिसून आल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार हे पथक हातीव गावात गेले असता त्यांना एक संशयित सापडला. त्याची चौकशी केल्यावर त्याने व्याघ्र प्रकल्पात शिरल्याचे कबूल केले आणि तालुक्यातील मारळ गावातील दोघा साथीदारांची माहिती दिली. त्यानंतर त्या दोघांनाही पकडण्यात आले.

विभागीय वनाधिकारी विशाल माळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिकारी कोकणाच्या बाजूने प्रकल्पात शिरत असल्याचे दिसून आले आहे. म्हणून त्या बाजूला असलेली वाट बंद करण्याचे वन विभागाने ठरवले आहे. तसेच प्रकल्पात कायमस्वरुपी स्वयंचलित कॅमेरे लावण्याचा वन विभागाचा मानस आहे. त्याचबरोबर, रात्रीची गस्त वाढवण्यात येणार आहे.

**सूत्र** – *राहूल गायकवाड. 'Poor security a worry at Sahyadri Tiger Reserve', timesofindia.indiatimes.com, १६.०४.२०२२.*
*'Maharashtra: Trio spotted carrying weapons into core zone of Sahyadri Tiger Reserve, arrested', timesofindia.indiatimes.com, ०५.०४.२०२२.*

### सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातील शालेय विद्यार्थ्यांच्या समस्येची उच्च न्यायालयाकडून गंभीर दखल

सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील खिरखिंडी गावातील मुलांना शाळेत जाण्यासाठी पत्कराव्या लागणाऱ्या धोक्याची गंभीर दखल मुंबई उच्च

न्यायालयाने घेतली आहे. ह्या मुलांना शालेय शिक्षण घेता यावे यासाठी कोणत्या उपाययोजना करणार, अशी विचारणा न्यायालयाने राज्य सरकारला केली आहे.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात येणाऱ्या खिरखिंडी गावातील मुलांना स्वतःच वल्हवून कोयना धरणाचा जलाशय पार केल्यानंतर पुढे दाट जंगलातून पायवाटेने चार किमी चालत जावे लागते. ह्या विषयीचे वृत्त प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने प्रसारमाध्यमांनी दिले होते. त्याची मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने स्वयंप्रेरणेने (सुओ मोटू) दखल घेऊन जनहित याचिका दाखल करून घेतली. ह्या प्रकरणी फेब्रुवारी महिन्यात प्राथमिक सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने न्यायमित्र म्हणून वकील संजीव कदम यांची नियुक्ती केली. कदम हे आणखी आवश्यक तपशीलांसह जनहित याचिका दाखल करून मुख्य सरकारी वकील कार्यालयाला याचिकेची प्रत देतील. त्यानंतर सरकारने एका आठवड्यात आपले उत्तर दाखल करावे, असे खंडपीठाने सांगितले होते.

त्यानंतर खिरखिंडी गावातील मुलांसाठी मोटरवर चालणारी होडी उपलब्ध करून दिल्याचे वृत्त आहे. न्यायमित्र कदम ह्यांनी न्यायालयात ही माहिती दिली. मात्र, हा तात्पुरता उपाय असून ह्या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढणे गरजेचे असल्याचे त्यांनी न्यायालयात सांगितले. वन विभागाने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, कोयना धरण बांधल्यानंतर खिरखिंडी गावातील प्रकल्पग्रस्तांसमोरपर्यायी निवास देण्याचा प्रस्ताव ठेवला होता. सात कुटुंब वगळता इतर कुटुंबांनी तो स्वीकारला.


शिक्षण निरीक्षकांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, ह्या गावातील १८ शालेय विद्यार्थ्यांमध्ये आठ विद्यार्थी इयत्ता आठवी व त्यावरील इयत्तांमध्ये आहेत; तर १० विद्यार्थी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकतात. गावाबाहेरील शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत शाळेत सुरक्षित वाहनाने ये-जा करण्याकरता प्रवासभत्ता दिला जाईल, असे शालेय शिक्षण विभागाने म्हटले आहे. संबंधित शाळेजवळ विद्यार्थी वसतिगृहाचा पर्याय दिला होता मात्र, पालकांनी तो नाकारला, असे तहसीलदारांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे सांगितले.

दरम्यान, उच्च न्यायालयाने राज्यातील इतर भागांमध्येही विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे सांगून, ह्या संदर्भात राज्य सरकारने उत्तर द्यावे, असे म्हटले आहे. ह्या प्रकरणी पुढील सुनावणी १६ जून रोजी होणार आहे.

**सूत्र** - *'सातारा : खिरखिंडीतील विद्यार्थ्यांना फायबर बोट', www.esakal.com, २०.०४.२०२२.*

*ओम्कार गोखले. 'Risky commute to Satara school: HC seeks info on problems faced by kids on way to school in Maharashtra districts', indianexpress.com, १३.०४.२०२२.*

*'साताऱ्यातील मुलींबाबत कोणत्या उपाययोजना?; न्यायालयाचा राज्य सरकारला सवाल', maharashtratimes.com, २१.०२.२०२२.*



## राज्यस्तरीय बातम्या

### वीजेचा धक्क्यामुळे होणाऱ्या वन्य प्राण्यांच्या मृत्युंची गंभीर दखल

वीजेचा धक्का लागून होत असलेल्या वाघ व बिबट्यांच्या मृत्युंची राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक PCCF

(वन्यजीव) सुनील लिमये यांनी गंभीर दखल घेतली आहे. अशा मृत्युंवर नियंत्रण आणण्यासाठी PCCF यांनी सर्व मुख्य वन संरक्षक आणि व्याघ्र प्रकल्पांच्या क्षेत्र संचालकांना आपापल्या क्षेत्रांतील ११ किलोवोल्टच्या वीजवाहक तारा आणि बेकायदा वीजवाहक कुंपणे काढून टाकण्याकरता कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिले आहेत. ह्या बाबतचा अहवाल १० फेब्रुवारी रोजी सादर करावा, असे लिमये यांनी १ फेब्रुवारीला दिलेल्या आदेशात म्हटले आहे.

राष्ट्रीय हरित प्राधिकरण NGTने जानेवारी २०२२ मध्ये एक निकाल दिला. त्यामध्ये वीजेच्या धक्क्यामुळे होणाऱ्या वन्य प्राण्यांच्या मृत्युंसाठी तमिळनाडू वीज मंडळाने त्या राज्याच्या वन विभागाला ७५ लाख रुपये भरपाई द्यावी, असे म्हटले आहे. ह्या निकालाचा दाखला लिमये यांनी आदेशात दिला आहे.

वन विभागाने महाराष्ट्र वीज मंडळाच्या अभियंत्यांसह विभागनिहाय बैठका घेऊन त्या त्या विभागातील संवेदनशील भागांची नोंद करावी; एकमेकांच्या सतत संपर्कात राहावे आणि नियमित पाहणीसाठी एकत्र येऊन फेऱ्या कराव्या, असे लिमये यांनी म्हटले आहे. तसेच, गेल्या पाच वर्षांत वीजवाहक तारांच्या साह्याने वन्य प्राणी मारण्याच्या गुन्ह्यांमधील आरोपी, संशयितांची विभागनिहाय यादी तयार करावी आणि ह्या यादीतील व्यक्तींवर पाळत ठेवावी, असे त्यांनी सांगितले.

संवेदनशील भागांमध्ये वाघांच्या संचारावर लक्ष ठेवण्याकरता एम-स्ट्राइप्स (MSTrIPES) प्रणालीचा वापर करता येईल, असे त्यांनी सुचवले आहे. ही प्रणाली व्याघ्रगणनेसाठी वापरली जाते.

**सूत्र** – *विजय पिंजरकर. 'PCCF seeks action plan to curb electrocution', www.timesofindia.indiatimes.com, ०९.०२.२०२२.*

**क्षेत्रीय वनाधिकाऱ्यांसाठी कायदेविषयक कार्यशाळा**



राज्यभरातील वनपरिक्षेत्र अधिकारी ते उप-वन संरक्षक दर्जाच्या वनाधिकाऱ्यांसाठी राज्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक PCCF (वन्यजीव) सुनील लिमये यांनी वनविषयक कायद्यांसंदर्भात कार्यशाळा घेतली. दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात ही कार्यशाळा झाली.

महाराष्ट्रात वन्यप्राण्यांची शिकार व त्यांच्या अवयवांची तस्करीचे प्रमाण मोठे आहे; ह्या बाबतीतदेशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.


वन विभागाची २५,००० पेक्षा अधिक प्रकरणे न्यायप्रविष्ट असून त्यात शिकार व तस्करीच्या प्रकरणांची संख्या जास्त आहे. मात्र, तपास करणाऱ्या वनाधिकाऱ्यांमध्ये संबंधित कायद्यांविषयी पुरेशा माहितीचा अभाव, अपुरे मनुष्यबळ, वन कोठडीची अनुपलब्धता आदी विविध कारणांमुळे शिकार व तस्करीच्या बहुतेक प्रकरणांतील आरोपींची न्यायालयात निर्दोष मुक्तता होते. परिणामी त्यांचे मनोधैर्य उंचावते आणि शिकार, तस्करी सुरूच राहाते. हे लक्षात घेऊन ह्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

चौकशीतील त्रुटींमुळे न्यायालयात वन विभागाची बाजू भक्कमपणे मांडता येत नाही, असे सरकारी वकील परीक्षित गणोरकर यांनी ह्या कार्यशाळेत सांगितले.

**सूत्र** – *'वन्यजीवांच्या शिकारीसोबतच तस्करीमुळे वन विभाग हतबल; आरोपींना शिक्षा होण्यासाठी मंथन', www.lokmat.com,३०.०३.२०२२.*

## पश्चिम महाराष्ट्र

### सातारा जिल्ह्यात वन विभागाने दोन वर्षांत ८० शिकारी पकडले



सातारा जिल्ह्यात कऱ्हाड, पाटण तालुक्यांत दोन वर्षांत ३५ गुन्ह्यांत तब्बल ८० शिकाऱ्यांना वन विभागाने पकडले आहे.

कऱ्हाड, पाटण तालुक्यांत सर्वाधिक शिकारी मोरांच्या झाल्या आहेत. त्याचे गुन्हे नोंद आहेत; २७ मोर-लांडोरींचा बळी गेला आहे. खेरीज सशाच्या सात, रानडुकराच्या सहा, साळिंदरा- (पॉर्क्युपाईन)च्या पाच, घोरपड (मॉनिटर लिझर्ड), भेकर (बार्किंग डीअर), कासव, उदमांजर (ऑटर) यांच्या प्रत्येकी दोन, बिबट्या, गवा प्रत्येकी एक अशा शिकारींचे गुन्हे वन विभागाकडे दाखल आहेत. ह्याखेरीज कबुतरे, घुबड, धनेश (हॉर्नबिल) आदी विविध पक्ष्यांची अंधश्रद्धेमुळे शिकार होते.

**सूत्र** – *'कऱ्हाड : दोन वर्षांत ८० शिकारी गजाआड', www.esakal.com, १७.०३.२०२२.*

## विदर्भ

### नागपूर-काटोल मार्गाच्या चौपदरीकरणाला वन विभागाचा आक्षेप

नागपूर-काटोल मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरू झाल्यानंतर ह्यातील काही भाग पूर्व विदर्भातील व्याघ्र संचारमार्गात येत असल्याचे सांगून वन विभागाने चौपदरीकरणाला आक्षेप घेतला आहे.

जवळपास ५० किमी लांबीच्या मार्गापैकी जवळपास निम्म्या लांबीच्या रस्त्याचे चौपदरीकरण तूर्तास थांबवण्यात आले आहे. ह्या भागातील १२ गावे व्याघ्र संचारमार्गात येतात. त्यामुळे वन्यजीवांच्या भ्रमणाबाबत असलेल्या मानकांनुसार योग्य पर्याय दिल्याशिवाय हे काम सुरू करता येणार नाही. मात्र, चौपदरीकरणाच्या ह्या कामाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्याला वन आणि पर्यावरणाबाबत मंजुरी गेल्या वर्षी मिळाली होती.

नागपूरमधून अमरावती, हैदराबाद, भोपाळ, रायपूरकडे जाणारे महामार्ग आहेत. हे सर्व महामार्ग वन्य प्राण्यांच्या भ्रमणमार्गांत येतात. पैकी, केवळ नागपूर-जबलपूर मार्गावर पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या वन क्षेत्रात वन्य प्राण्यांसाठी नऊ ठिकाणी महामार्गाखालून रस्ता ओलांडण्याची सोय करण्यात आली आहे. हा पर्याय नागपूर-काटोल मार्गालाही लागू होऊ शकेल, मात्र, त्याकरता आराखड्यात बदल, संबंधित विभागांकडून मंजुरी आणि वाढीव खर्च ह्या बाबी आवश्यक ठरतील, असे वृत्तात नमूद केले आहे.

दरम्यान, वन विभागाने आक्षेप नोंदवल्यानंतर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया – WII चा सल्ला मागितला आहे.

**सूत्र** – *वसीम कुरैशी. 'फोरलेनचे काम सुरू झाल्यावर वन विभागाला आठवले टायगर कॉरिडॉर', www.lokmat.com, ०७.०४.२०२२.*



## कमलापूर छावणीतील हत्तींच्या स्थानांतरणाबाबत पुनर्विचाराची स्थानिकांची मागणी

गडचिरोली जिल्ह्यातील कमलापूर छावणीतील हत्तींचे स्थानांतरण करण्याच्या निर्णयाबाबत पुनर्विचार करावा. नैसर्गिक अधिवासात त्यांचा मुक्तसंचार कायम ठेवावा, अशी मागणी राज्य वन्यजीव सल्लागार मंडळाचे सदस्य तथा इको-प्रो संस्थेचे अध्यक्ष बंडू धोतरे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

पातानिल व कमलापूर छावण्यांमधील हत्ती गुजरातमधील प्राणिसंग्रहालयाला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गडचिरोलीचा हा वन्यजीव वारसा हलवण्याच्या निर्णयाविरोधामागील जनभावना (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १ क्र. ८*) लक्षात घेता या निर्णयाचा पुनर्विचार व्हावा, अशी मागणी धोतरे यांनी निवेदनातून केली आहे.

ह्या दोन्ही छावण्यांतील हत्ती मागील पाच दशकांहून अधिक काळापासून वन विभागाच्या कामांत सहकार्य करत आले आहेत. काही हत्ती ८५-९० वर्षांचेसुद्धा आहेत. त्यांचा आता कामासाठी उपयोग होत नाही. कमलापूर ग्रामसभेने मात्र या हत्तींचे स्थानांतरण होऊ नये, असा ठराव घेतला आहे. कमलापूर हत्ती छावणीला महाराष्ट्राबरोबर तेलंगणमधील पर्यटकही भेट देतात. कुठलीही विकासाची कामे, अधिक खर्च न करताही ह्या छावणीमुळे ह्या भागातील पर्यटन वाढले. गावकऱ्यांना काही प्रमाणात रोजगार मिळाला. विकासाची संधी चालून आली. कर्नाटक, केरळ व तामिळनाडूच्या धर्तीवर गडचिरोलीतही हत्ती छावणी विकसित करण्याची वन विभागाला संधी आहे. याकरता वनाधिकारी, तज्ज्ञ आणि स्थानिकांची समिती तयार करून कमलापूर हत्ती छावणीचा विकास करून ही समस्या सोडवावी, अशी स्थानिकांची मागणी आहे.

**सूत्र -** *'कमलापूरच्या हत्तींसाठी मुख्यमंत्र्यांना साकडं, स्थानांतरणाविरुद्ध ग्रामसभेचा ठराव', maharashtratimes.com, ०३.०२.२०२२.*

## माणसर-खांडवा रस्ता रुंदीकरणासाठी २०,५०० झाडांचा बळी; भरपाईदाखल लावलेली लाखभर रोपे मृत



पेंच, कान्हा व नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पांजवळील राष्ट्रीय महामार्ग-७ च्या माणसर ते खांडवा टप्प्यात रुंदीकरणासाठी वर्ष २०१५ मध्ये २०,५०० हून अधिक झाडे तोडण्यात आली होती. त्या बदल्यात २०१६ मध्ये दक्षिण उमरेड वन परिक्षेत्रातील वन जमिनीवर १,११,००० रोपे लावण्यात आली. मात्र सहा वर्षांनंतर आजघडीला ह्या रोपांची उंची सहा फुटांवरही गेलेली नाही व बहुतेक रोपे वाळून गेली आहेत.

नागपूर-स्थित स्वच्छ असोसिएशन ह्या स्वयंसेवी संस्थेने वृक्षारोपण केलेल्या क्षेत्राला भेट दिली असता भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) आणि वन विभागाच्या कारभारातील अनियमितता उघडकीस आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठाने २४ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रीय महामार्ग-७ संदर्भातील वृत्ताची स्वतःहून दखल घेत ह्या महामार्गाच्या भागात असलेल्या पेंच, कान्हा व नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पादरम्यानच्या वन्यजीव संचारमार्गाबाबत काही आदेश दिले. त्यामध्ये तोडल्या जाणाऱ्या २०,५०० झाडांच्या भरपाईदाखल १,११,००० म्हणजे पाचपटीने रोपे लावण्याचा आदेश आहे. NHAI ने न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात १०० हेक्टर वनजमिनीवर ही १,११,००० रोपे लावल्याचे म्हटले आहे.


त्यानंतर ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी वन विभागाने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले; त्यात

म्हटले आहे की लावलेल्या रोपांपैकी ८३ ते ९७ टक्के रोपे जगली आहेत. मात्र, यंदा फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात स्वच्छ असोसिएशनने केलेल्या क्षेत्रभेटीत दिसून आले की लावलेल्या लाखभर रोपांपैकी अवघी ५०० रोपे जेमतेमच जिवंत आहेत.

भरपाईदाखल वृक्षारोपणासाठी व महामार्गाच्या रुंदीकरणासाठी वनजमीन घेतली त्याकरता जवळपास साडेसात कोटी रुपये निधी CAMPA कडे दिल्याचे NHAI च्या प्रकल्प संचालकांनी सांगितले. तसेच, लावलेल्या रोपांच्या देखभालीसाठी आणि वाळून गेलेल्या रोपांच्या जागी नव्याने रोपे लावण्यासाठी वन विभागाला निधी दिल्याचेही ते म्हणाले. ह्याबाबत क्षेत्रभेट केल्यानंतरच आपण भाष्य करू, असे नागपूर उप वन संरक्षकांनी सांगितले.

**सूत्र** – *विजय पिंजरकर. 'NHAI felled 20,500 trees on NH-7, planted 1.10 lakh, none survived', www.timesofindia.indiatimes.com, १६.०२.२०२२.*

**गडचिरोली जिल्ह्यात फेब्रुवारी, मार्चमध्ये २० चौ. किमी जंगलाला वणवा**



यंदा फेब्रुवारी ते मार्च ह्या दोन महिन्यांच्या कालावधीत गडचिरोली जिल्ह्यात जवळपास २०.३ चौ. किमी क्षेत्रावरील जंगल वणव्यात जळून खाक झाले आहे.

मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून मोहाची फुले झाडावरून खाली पडतात. त्यापूर्वी पानगळ झालेली असल्याने जमिनीवर मोठ्या प्रमाणावर पालापाचोळा असतो. फुले पडण्यापूर्वी ह्या पालापाचोळ्याला आग लावली जाते, जेणेकरून जमिनीवर पडलेली फुले सहज गोळा करता यावीत. वाळलेल्या पानांना लावलेल्या आगी नियंत्रणाबाहेर जातात आणि शेकडो चौ. किमी जंगल जळून खाक होते. ह्याबाबत जागरूकता निर्माण करूनही लोक ऐकत नाहीत, असे वन विभागाचे म्हणणे आहे.

**सूत्र** - *'गडचिरोली जिल्ह्यात दोन हजार हेक्टर क्षेत्रावर भडकला वणवा', www.lokmat.com, ०१.०४.२०२२.*



---

**आफ्रिकी सफारीसह नवे वन्यजीव प्रकल्प उभारण्याबाबत राज्य सरकारची घोषणा**

नागपुरातील बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयात आफ्रिकी सफारी प्रकल्प उभारण्यासह अन्य काही घोषणा राज्य सरकारने एप्रिल महिन्यात केल्या.

पुणे जिल्ह्यात ९० हेक्टर वन क्षेत्रात ६० कोटी रुपये खर्चून बिबट्या सफारी; तर चंद्रपूर जिल्ह्यात १७१

हेक्टर जमिनीवर व्याघ्र सफारी व वन्यजीव बचाव केंद्र उभारण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. त्याचबरोबर, जैवविविधतेच्या संवर्धनाकरता येत्या पाच वर्षांत महाराष्ट्र जनुकीय बँक प्रकल्प निर्मितीसाठी राज्य सरकार २८६ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. आफ्रिकी सफारी प्रकल्पासाठी वर्ष २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

**सूत्र** – *'Nagpur to get a 100 crore African wildlife safari soon', indianexpress.com, १०.०४.२०२२.*

## कोकण

### महाराष्ट्रात ग्रीन सी टर्टल ह्या प्रजातीच्या समुद्री कासवाच्या घरट्याची पहिली नोंद


सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवबाग-तारकर्लीच्या समुद्रकिनाऱ्यावर ग्रीन सी टर्टल नावाने ओळखल्या जाणाऱ्या समुद्री कासवाने कोकणातील किनाऱ्यावर पहिल्यांदाच अंडी घातल्याची नोंद झाली आहे.

ऑलिव रिडले कासवापेक्षा मोठे एक कासव ११ जानेवारी रोजी देवबाग-तारकर्लीच्या किनाऱ्यावर आल्याचे निरीक्षण महाराष्ट्र वन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या मॅन्ग्रूव फाउण्डेशन (MF)ला सहाय्य करणाऱ्या स्वयंसेवकांनी नोंदवले होते. ह्या कासवाची नेमकी प्रजाती ओळखता न आल्याने स्वयंसेवकांनी त्याची छायाचित्रे MF कडे पाठवली. त्यावरून ते ग्रीन सी टर्टल असल्याचे स्पष्ट झाले.

५ मार्च रोजी ह्या ग्रीन सी टर्टलने घातलेल्या अंड्यांमधून ७४ पिल्ले बाहेर आली, MFमध्ये कार्यरत समुद्री-जीवशास्त्रज्ञ हर्षद कर्वे यांनी ही माहिती दिली.

**सूत्र** – *'Green sea turtle nesting site documented for first time in Maharashtra: Expert', www.freepressjournal.in, ०६.०३.२०२२.*

### रत्नागिरी जिल्ह्यात अंकन केलेल्या समुद्री कासवांच्या निरीक्षणातून नवी माहिती



रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर येणाऱ्या पाच ऑलिव रिडले कासवांचे उपग्रहाशी संलग्न उपकरणाधारे अंकन करण्यात आले आहे (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड ३ अंक १ क्र. ८*).

वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (WII) आणि मॅन्ग्रूव फाउण्डेशन (MF) यांनी एकत्र येऊन हा प्रयोग केला आहे. ह्या दोन्ही संस्थांमधील संशोधन अंकन केलेल्या कासवांच्या स्थलांतराचा व अंडी देण्यासाठी किनाऱ्यावर येण्याबाबतचा अभ्यास करण्याकरता त्यांच्याकडून उपग्रहाधारे येणाऱ्या माहितीवर लक्ष ठेवून आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रकिनाऱ्यावर WII आणि MF ने २५ जानेवारी रोजी दोन आणि १५-१६ फेब्रुवारी रोजी तीन अशा एकूण पाच कासवांना अंकन केले व त्यांना अनुक्रमे प्रथमा, सावनी, वनश्री, रेवा आणि लक्ष्मी अशी नावे दिली. अंकनासाठी वापरलेल्या उपकरणाला 'प्लॅटफॉर्म ट्रान्समीटर टर्मिनल' असे म्हणतात व ते कासवाच्या पाठीवरील कवचावर चिकटवले जाते. अशा प्रकारे महाराष्ट्रातील सागरी कासवांचे अंकन करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

ह्या पूर्वी वर्ष २००१ मध्ये देशात ओदिशाच्या समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या संख्येने येणाऱ्या ऑलिव रिडले कासवांचे अंकन करण्यात आले होते. तेव्हा ओदिशाच्या

किनाऱ्यावर अंडी घालून गेलेले एक कासव श्रीलंकेच्या दिशेने स्थलांतरित झाल्याचे दिसून आले होते.

ओदिशाच्या किनाऱ्यावर येणारी ऑलिव रिडले कासवे आणि महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर येणारी ह्याच प्रजातीची कासवे ह्यांच्यातील वेगळेपण असे की ओदिशात ती मोठ्या संख्येने, समूहाने अंडी घालण्यासाठी येतात; तर महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर तुरळक व एकेकटी येतात. किनारपट्टीवरील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये व त्यातही रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, वेळास आणि आंजर्ले ह्या समुद्रकिनाऱ्यांवर अंडी घालण्यासाठी येणाऱ्या कासवांची संख्या राज्यातील इतर किनाऱ्यांच्या तुलनेत अधिक आहे.


WII मधील वरिष्ठ संशोधक डॉ. आर. सुरेश कुमार यांनी सांगितले की सामूहिक कासवांमध्ये आपापसांत संवाद असल्याचे आढळून आले आहे तसे एकेकट्याने अंडी घालण्यासाठी येणाऱ्या कासवांमध्ये नसावे. तेव्हा, अशा कासवांच्या स्थलांतराविषयी आणि अंडी घालण्याच्या वेळेला वागणुकीबाबत माहिती मिळवण्यासाठी संशोधक प्रयत्नशील आहेत.

अंकन करून सोडल्यानंतर प्रथमा आणि सावनी रत्नागिरीच्या उत्तरेकडे तर वनश्री व रेवा दक्षिणेकडे गेल्याचे संशोधकांना दिसून आले. लक्ष्मी ह्या कासवाशी मार्च महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात संपर्क तुटला. लक्ष्मीच्या कवचावर बसवलेले उपकरण बिघडले असावे किंवा लक्ष्मीचा मृत्यू झाला असावा, असा संशोधकांचा अंदाज आहे. प्रथमा हिला वेळास किनाऱ्यावर अंकन केले होते; तिने वेळासपासून उत्तरेकडे २५० किमी अंतर कापले. सुरुवातीला प्रथमा गुहागर किनाऱ्यालगत आली होती. १४ मार्चपासून मात्र तिने किनाऱ्यापासून दूर जाण्यास सुरुवात केली. प्रथमाने वेळास किनाऱ्यावर घातलेल्या १२३ अंड्यांपैकी दोन अंड्यांमधून १७ मार्च रोजी दोन पिल्ले बाहेर आली.

आंजर्ले किनाऱ्यावर अंकन करून सोडलेल्या सावनीने २५ फेब्रुवारी रोजी आंजर्ले शेजारीच असलेल्या केळशीच्या समुद्रकिनाऱ्यावर पुन्हा एकदा अंडी घातली. ह्या हंगामात सावनीची अंडी घालण्याची ही बहुधा तिसरी आणि केळशीच्या किनाऱ्यावर अंडी घालण्याची दुसरी खेप आहे. आंजर्ल्यात तिने ८७ व केळशीत ७६ अंडी घातली आहेत. ऑलिव रिडले कासवाच्या मादीने एकाच हंगामात एकापेक्षा अधिक वेळा अंडी घातल्याची ही पहिली खात्रीशीर नोंद असल्याचे डॉ. कुमार यांनी सांगितले. WII आणि MF च्या संशोधकांनी अशा वागणुकीचा अंदाज वर्तवला होता.


दरम्यान, मार्च अखेरीस चारही कासवे किनाऱ्यापासून साधारणपणे १०० किमी अंतराच्या आतबाहेर असल्याचे दिसून आले. खोल समुद्रात शिरण्यापूर्वी पाण्याचे प्रवाह सोयीस्कर होण्याची ती वाट पाहात असावीत; त्यानंतर ती लक्षद्वीप किंवा ओमान, सोमालियाच्या दिशेने जातील आणि पुढच्या हंगामात म्हणजे येत्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये महाराष्ट्राच्या किनारपट्टीलगत येतील, असा अंदाज संशोधकांनी व्यक्त केला आहे.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यातील वृत्तात नमूद केल्यानुसार, त्या सुमारास प्रथमा ह्या कासवाने गुजरातचा समुद्र गाठला होता; रेवा मंगळुरूपर्यंत पोहोचली होती; तर सावनी व वनश्री दक्षिणेकडे वळल्या होत्या.




**सूत्र -** *'Maharashtra's 1st satellite-tagged Olive Ridley turtle swims 250 km from state, may soon enter Gujarat waters',*

*indianexpress.com, २५.०३.२०२२.*
*संजना भालेराव. 'At Velas, two hatchlings of Maharashtra's first satellite-tagged turtle emerge', indianexpress.com, १९.०३.२०२२.*
*प्रयाग अरोरा-देसाई. 'Researchers lose radio contact with Olive Ridley', www.hindustantimes.com, १२.०३.२०२२.*
*संजना भालेराव. 'Maharashtra: Tagged turtle returns to lay eggs; confirms nesting behaviour', indianexpress.com, २६.०२.२०२२.*
*संजना भालेराव. 'Maharashtra's first satellite tagged Olive Ridley turtle journeys 75 km south of the state coastline', www.indianexpress.com, १३.०२.२०२२.*
*'रत्नागिरीत आणखी दोन कासवांना 'सॅटेलाइट ट्रान्समीटर'', www.loksatta.com, १६.०२.२०२२.*
*'टॅग केलेले कासव पोहोचले मंगळुरूला; कासवाच्या प्रवासाचे रहस्य उलगडते आहे', www.lokmat.com, ११.०४.२०२२.*



## माणूस-बिबट्या संघर्ष संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| अहमदनगर | संगमनेर | आश्वी बुद्रुक इथे बिबट्याच्या हल्ल्यात १४ वर्षीय मुलगा जखमी | लोकसत्ता, २४.०२.२०२२ |
| औरंगाबाद | कन्नड | सोयगाव भागात दोन बिबट्यांचा विषप्रयोगाने मृत्यू | लोकसत्ता, ०१.०३.२०२२ |
| चंद्रपूर | चंद्रपूर | दुर्गापुरात आठ वर्षांचा मुलगा बिबट्याकडून ठार | लोकसत्ता, ३०.०३.२०२२ |
| | | दुर्गापूर वेकोली इथे कोळसा खाणीच्या खड्ड्यात पडून बिबट्याचा मृत्यू | महाराष्ट्र टाइम्स, १६.०२.२०२२ |
| पालघर | वसई | विरारजवळ चार पाळीव कुत्र्यांना ठार करणारा बिबट्या जेरबंद | लोकसत्ता, ३०.०३.२०२२ |
| सातारा | कऱ्हाड | उंब्रज मस्करवाडी इथे बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | ईसकाळ, १७.०३.२०२२ |



## आंतरराज्यीय बातम्या

### कान्हा व्याघ्र प्रकल्प

**कान्हा व्याघ्र प्रकल्पात नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया**

कान्हा व्याघ्र प्रकल्पातील जवळपास ८० टक्के भाग प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या नक्षलवादाच्या प्रभावाखाली असून, छत्तीसगड आणि महाराष्ट्र पोलिसांकडून दडपण वाढवल्यापासून नक्षलवाद्यांनीही कारवाया वाढवल्या आहेत. मोचा आणि खाटिया ह्या नक्षलवादी दलमच्या स्थानिक पातळीवरील प्रभावामुळे वन विभागाचे कनिष्ठ पातळीवरील कर्मचारी कर्तव्य बजावण्यास घाबरत असल्याचे वृत्त आहे. कान्हा प्रकल्पातील हा विषय गांभीर्याने घ्यावा, अशा आशयाचे पत्र केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांना लिहीले आहे.

कान्हा व्याघ्र प्रकल्पात नक्षलवादी संघटनांनी दहशत निर्माण केली असून त्यांनी वाघ, बिबट्यांना ठार केल्याचे वृत्तात नमूद केले आहे. कान्हा राष्ट्रीय उद्यानात पूर्वीपासून सक्रीय असलेल्या नक्षलवाद्यांनी आता व्याघ्र प्रकल्पातील वाघांसाठी सुरक्षित मानल्या गेलेल्या भागातही शिरकाव केला आहे. इथे परिस्थिती अत्यंत गंभीर असून छत्तीसगडमधील उदांती व इंद्रावती व्याघ्र प्रकल्पांवर गेल्या दशकात जसे नक्षलवाद्यांनी नियंत्रण मिळवले तशी अवस्था कान्हाची होऊ शकते, अशी भीती पर्यावरणवादी व आजीमाजी वनाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. छत्तीसगडमधील दोन व्याघ्र प्रकल्पांमध्ये नक्षलवाद्यांमुळे व्याघ्रगणना करणेही अवघड होते.

**सूत्र** – *अभिलाष खांडेकर. 'कान्हा पार्कच्या सुरक्षाव्यवस्थेचा आढावा घ्या; केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र', www.lokmat.com, ०६.०४.२०२२.*


*अभिलाष खांडेकर. 'कान्हा नॅशनल पार्क झाला नक्षल छावणी, वन्यजीव तज्ञ व पर्यावरणवाद्यांमध्ये चिंता; कर्मचाऱ्यांमध्ये भीती', www.lokmat.com, ०५.०४.२०२२.*




---

### सातपुडा व्याघ्र प्रकल्प/मेळघाट व्याघ्र प्रकल्प

**सातपुडा व्याघ्र प्रकल्पातील वाघीण पोहोचली मेळघाट व्याघ्र प्रकल्पात**




संचारावर लक्ष ठेवण्यासाठी रेडिओ कॉलर बसवण्यात आलेली चार वर्षांची वाघीण मध्य प्रदेशातील सातपुडा व्याघ्र प्रकल्पापासून २५० किमी अंतर चालून महाराष्ट्रातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पात आली आहे. ह्या ४५ दिवसांच्या प्रवासात तिने ११ वन परिक्षेत्र आणि चार वन विभाग ओलांडल्याचे दिसून आले आहे.

मेळघाट आणि सातपुडा व्याघ्र प्रकल्पांदरम्यान वाघांचा संचार असल्याचे ज्ञात असले तरी रेडिओ कॉलरच्या साह्याने अशा प्रकारची नोंद होण्याची ही पहिलीच वेळ आहे. ही वाघीण जून २०२१ मध्ये

बांधवगड व्याघ्र प्रकल्पातून सातपुड्यात स्थानांतरित करण्यात आली होती. तिने डिसेंबरच्या मध्यात सातपुडा सोडले; ३१ जानेवारी रोजी ती मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या अंबाबरवा वन्यजीव अभयारण्यातील सोनाळा वन परिक्षेत्रातील अन्यार वनक्षेत्रात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात दिसून आली. सातपुडा व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी ही माहिती दिली.

ही वाघीण होशंगाबाद, हरदा, खांडवा आणि बुऱ्हाणपूर अशा चार वन विभागांतून मेळघाटाकडे गेली. तिने केलेल्या प्रवासामुळे केसलाघाट ते होशंगाबाद हा वन्यजीव संचारमार्ग वाघाच्या संचारायोग्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे वन विभाग आणि वन्यजीवप्रेमींनी आनंद व्यक्त केला व त्याचबरोबरभारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा (NHAI)ने ह्या संचारमार्गातील रस्त्याचे रुंदीकरण वन्यप्राण्यांच्या संचारासाठी उपाययोजनांविनाच हाती घेतल्याकडे लक्ष वेधले आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, मध्य प्रदेश वन विभाग आणि NHAI चा हा दृष्टिकोन निष्काळजीपणाचा आहेव त्यामुळे ह्या संचारपट्ट्याचे कायमस्वरुपी नुकसान होईल, असे मध्य भारतात कार्यरत वन्यजीव अभ्यासकांनी म्हटले आहे.

**सूत्र** – *विजय पिंजरकर. 'Radio-collared tigress treks 250 km from Satpura to Melghat reserve in Maharashtra', www.thetimesofindia.indiatimes.com, ०५.०२.२०२२.*



## राष्ट्रीय बातम्या

### भारतात ३१०० लांडगे; पहिलीच पद्धतशीर गणना

वैज्ञानिक पद्धतीने करण्यात आलेल्या लांडग्यांच्या पहिल्या गणनेत देशात ३१०० लांडगे (इंडियन पेनिन्सुलर वुल्फ) आढळून आले आहेत. मध्य प्रदेशात सर्वाधिक (७७२) त्यापाठोपाठ राजस्थान (५३२), गुजरात (४९४), महाराष्ट्र (३९६) आणि छत्तीसगड (३२०) अशी राज्यांची उतरती क्रमवारी आहे.

स्वयंचलित कॅमेरे, रेडिओ टेलिमेट्री व उपलब्ध खात्रीशीर नोंदींच्या आधारे १,२१,३३७ चौ. किमी क्षेत्रात हा अभ्यास करण्यात आला.

गणनेबरोबर करण्यात आलेल्या अभ्यासात दिसून आले आहे की भारतात ह्या लांडग्यांच्या ४२३ ते ५२० कळपांना पुरेल इतका अधिवास आहे. ह्या मध्ये प्रत्येक कळपात किमान तीन लांडगे अशी संख्या लक्षात घेतली आहे. साधारणपणे ३,६४,४२५ चौ. किमी क्षेत्र लांडग्यांसाठी योग्य अधिवासाने व्यापले असून ह्या अधिवासांना जोडणारे भ्रमणमार्गही अस्तित्त्वात आहेत. सर्वात मोठे अधिवासयोग्य क्षेत्र सौराष्ट्र-कच्छ-थर प्रदेशात आहे. बांग्लादेश, सुंदरबनाचा भारतीय प्रदेश, उत्तराखंडातील राजाजी व्याघ्र प्रकल्प, बिहारमधील वाल्मिकी व्याघ्र प्रकल्प आणि कर्नाटकातील कावेरी वन्यजीव अभयारण्य ह्या ठिकाणी मधल्या काळात लांडगे नाहीसे झाले होते. मात्र, ह्या भागांत लांडग्यांचा संचार ह्या अभ्यासादरम्यान दिसून आला आहे; तर कच्छ व राजस्थानातील काही भागांत मात्र लांडग्यांची संख्या घटली आहे.

वाइल्डलाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया – WII चे उच्चाधिकारी व ह्या अभ्यासाचे मुख्य डॉ. यादवेंद्र झाला यांनी सांगितले की विकासकामांमुळे होणारा अधिवासाचा ऱ्हास, रस्ते-अपघात, रोगराई, कुत्र्यांबरोबरचे संकरण आणि मेंढपाळांकडून होणारे मृत्यू ह्या कारणांनी

लांडग्याचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे.

**सूत्र** – *शिवानी आझाद. 'Wolves as endangered as tigers in India; only 3,100 left', www.timesofindia.indiatimes.com,* ३१.०३.२०२२.

**उपग्रहामार्फत मिळालेल्या माहितीनुसार भारताच्या ३३% किनाऱ्याची सातत्याने धूप**



भारतीय किनारपट्टीच्या ३३.६% भागाची सातत्याने धूप होत असल्याचे देशाचे ग्रह विज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी २ फेब्रुवारी रोजी लोकसभेत एका लेखी उत्तराद्वारे सांगितले.

'नॅशनल सेंटर फॉर कोस्टल रीसर्च' ह्या संस्थेने १९९० ते २०१८ ह्या २८ वर्षांच्या कालावधीत उपग्रहामार्फत गोळा केलेल्या माहितीच्या आधारे हे निरीक्षण नोंदवले आहे. 'इंडिअन नॅशनल सेंटर फॉर ओशन इन्फोर्मेशन सर्विसेस्' (INCOIS) ने भारताच्या किनारपट्टीला असलेला धोका दर्शवणारा निर्देशांक –CVI (Coastal Vunerability Index) सह किनारपट्टीचा १:१००००० प्रमाणातील नकाशा प्रकाशित केला आहे. विविध अभ्यासांमध्ये आढळून आले आहे की जवळपास १२४ किमी लांबीच्या किनारपट्टीचा CVI उच्चांकी आहे.

राज्यनिहाय निर्देशांक (उतरती भाजणी)

| राज्य | किनारपट्टीची लांबी (किमी) | एकूण किनारपट्टीच्या तुलनेत टक्केवारी |
|---|---|---|
| तमिळनाडू | ६५ | ६.३८ |
| पश्चिम बंगाल | ४९ | २.५६ |
| कर्नाटक व गोवा | ४८ | ९.५४ |
| ओदिशा | ३७ | ७.५१ |
| केरळ | १५ | २.३९ |
| निकोबार बेटे | ८ | ०.९७ |
| अंदमान बेटे | २४ | ०.९६ |
| आंध्र प्रदेश | ६ | ०.५५ |

**सूत्र** - *'33.6% of Indian coast under varying rate of erosion, says govt.', www.business- standard.com,* ०२.०२.२०२२.

संरक्षित क्षेत्रे आणि त्यातील कर्मचारी वर्गासाठी

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

मदतीचे आवाहन

संरक्षित क्षेत्राचे हे वार्तापत्र निर्माण करताना वाचकवर्गात महाराष्ट्रातील वन कर्मचारी आणि संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन करणारे अधिकारी हा एक मोठा गट असेल, असे लक्षात घेतले आहे. आजही जिथे इंटरनेट पोहोचलेले नाही, अशा दुर्गम भागात पोहोचावे, हा एक हेतू या वार्तापत्राची छापील आवृत्ती काढण्यामागे आहे. आमच्या यादीत अशा काही व्यक्तींचा समावेश आहे. मात्र, ही यादी आणखी मोठी व्हावी, अशी आमची इच्छा आहे. त्याकरता, ही विनंती.

वाचक हो, तुम्हाला दरवर्षी रु. १५० भरून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रात व त्याच्या अवतीभवती काम करणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी हे वार्तापत्र भेट देता येईल. संरक्षित क्षेत्र/कर्मचारी/अधिकारी किंवा मार्गदर्शक/ग्रामस्थाचे नाव, पत्ता ही माहिती आम्हाला पाठवा. प्रती पोहोचवण्याची जबाबदारी आमची!

संपर्कः संपादकीय पत्ता c/o कल्पवृक्ष किंवा marathipaupdate@gmail.com

## Three distinctive books from the *PA Update* stable

The set of 3 available for a special discounted priceof Rs. 1000


Get a comprehensive view of conservation and protected area management issues from across India


News, information and perspective collated from 25 years of publishing the


*Protected Area Update*


1) *Conservation Kaleidoscope: People, Protected Areas and Wildlife in Contemporary India*, 2021, 450 pp, 140 line-drawings., Price: 650
2) *The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra: News and Information from the Protected Area Update 1996-2015,* 2019. 250 pp, 100 line-drawings, Price: Rs. 400
3) *The State of Wildlife in North-East India 1996-2011: A compilation of news from the Protected Area Update,* 2013, 330 pp, 100 line-drawings, Price: Rs. 300

**For more details and to order copies, pls write to psekhsaria@gmail.com**



## थोडक्यात पण महत्त्वाचे...

### जैवविविधता आणि भाषिक विविधता यांच्यातील परस्परसंबंध

जगात आज जे काही जैवविविधता संपन्न प्रदेश शिल्लक आहेत त्यातील बहुतांश ठिकाणी आदिवासी आणि ग्रामीण जनतेचे वास्तव्य आढळून येते. परंतु यात आश्चर्य नाही कारण या लोकांची जीवनपद्धती शहरी लोकांच्या तुलनेत बरीच निसर्गानुकूल आहे. आपल्या प्रदेशातील सजीवसृष्टी संबंधीचे अमूल्य ज्ञान त्यांना वारसारुपाने मिळाले आहे आणि या ज्ञानाची वाहक आहे त्यांची भाषा. आज पृथ्वीतलावरील जैवविविधता अभूतपूर्व वेगाने नष्ट होत असतानाच अनेक प्राचीन भाषांचाही ऱ्हास होत चालला आहे वा त्यांच्यातील निसर्गविषयक शब्द नामशेष होत आहेत, हा काही योगायोग नाही.

एखाद्या प्रदेशातील वनस्पती, प्राणी, पक्षी यांच्या स्थानिक नावात त्यांच्याविषयी अशी माहिती असू शकते जी इतर भाषेत असेलच असे नाही. शिवाय, भाषा ही संस्कृतीचे प्रतिबिंब असते. एखाद्या प्रदेशातील संस्कृतीचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तिथल्या भाषेतून प्रकट होत असतो. भारतीय संस्कृती ही मुळातच निसर्गपूजक असल्याने भारतीय भाषांत निसर्गाकडे निर्जीव वस्तू म्हणून न पाहता एक रसरशीत जिवंत घटक म्हणून पाहिलेजाते. कॉमन हॉक कक्कू या पक्ष्याला ब्रिटीश लोक ‘ब्रेन फिव्हर’ म्हणत. कदाचित त्याची शीळ त्यांना डोक्याला ताप  वाटली असावी. परंतु भारतीयांसाठी  ही शीळ उन्हाळा संपून पावसाळा येणार असल्याचा  संकेत असते. त्यामुळे मराठीत त्याला पावश्या व हिंदीत पपीहा (पीकहाँ) म्हटले जाते!

स्थानिक भाषांत केवळ तिथल्या सजीवांसंबंधी महत्त्वपूर्ण माहितीच नव्हे; तर त्या प्रदेशातील नैसर्गिक वातावरणात कसे जगावे या विषयी मार्गदर्शनही असते. जंगलातील कोणत्या वनस्पती खाण्यास योग्य कोणत्या अयोग्य, वाघ, बिबटे यांसारख्या प्राण्यांपासून अथवा मुसळधार पाऊस, वादळवाऱ्यापासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याची माहिती त्यांना त्यांच्या पूर्वजांकडून वारशाने मिळत आलेली असते. उदा. आज ज्या ठिकाणी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आहे त्या परिसरात वारली समुदाय शतकानुशतके राहतो आहे. परंतु इथे मानव-बिबट्या संघर्षात शहरी लोकांच्या तुलनेत वारली लोक जखमी वा त्यांचा मृत्यू होण्याचे प्रमाण नगण्य आहे.

शेकडो वर्षांपासून चालत आलेला हा ज्ञानाचा वारसा मानवाला निसर्गासह सहजीवनाचा मार्ग दाखवू शकतो आणि त्याला विनाशा पासून वाचवू शकतो. परंतु हे ज्ञानभांडार उघडण्याची संहिता असते स्थानिक भाषेत! म्हणूनच निसर्ग संवर्धनासाठी विविध भाषा आणि संस्कृतींचे संवर्धनही अपरिहार्य ठरते.

कोणत्याही प्रदेशातील जैवविविधता संवर्धनाचे प्रयत्न यशस्वी होण्यासाठी त्यात तिथल्या स्थानिक समुदायांचा सहभाग अतिशय महत्त्वाचा ठरतो. स्थानिक समुदायांच्या चिंता, समस्या समजून घेण्यासाठी, त्यांना निसर्ग संवर्धनाचे लाभ पटवून देण्यासाठी त्यांच्याच भाषेत त्यांच्याशी संवाद साधल्यास तो अधिक परिणामकारक ठरतो. यामुळेच आता अनेक संवर्धनतज्ञ स्थानिक भाषांतून जागरुकता-साहित्यनिर्मितीवर भर देत आहेत.

प्रादेशिक भाषांतून पर्यावरणाविषयक साहित्यनिर्मिती आणि  इंग्रजीतून प्रादेशिक भाषांत तसेच प्रादेशिक भाषांमधून इंग्रजीत निसर्गविषयक साहित्याचा अनुवाद होणे गरजेचे आहे. यातून ज्ञानाचे आदानप्रदान होऊन संवर्धनाच्या प्रयत्नांना बळ मिळेल.

- **परीक्षित सूर्यवंशी**

(लेखक वन्यजीव संवर्धन विषयक लेखक, अनुवादक आहेत.)

suryavanshipd@gmail.com

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004